# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून कोरेगाव-भिमा येथील विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी विशेष बससेवेचे नियोजन

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून दि. १ जानेवारी २०२५ रोजी कोरेगाव-भिमा येथील विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमासाठी विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. कोरेगांव-भिमा येथे विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यातून तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहर व ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित राहत असतात. या भाविकांच्या सोयीसाठी तसेच येणारी वाढीव प्रवासी संख्या विचारात घेवून परिवहन महामंडळाच्या वतीने दि. ३१/१२/२०२४ व दि. ०१/०१/२०२५ रोजी खालील प्रमाणे जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

**लोणीकंद विभाग**

- दि. ३१/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० ते पहाटे ०४.०० पर्यंत तुळापूर फाटा, लोणीकंद कुस्ती मैदान, खंडोबा माळ, चिंचबन, फुलगाव शाळा व पेरणे गाव येथून ७५ मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.
- तसेच दि. ०१/०१/२०२५ रोजी पहाटे ०४.०० ते रात्री १२.०० पर्यंत तुळापूर फाटा, चिंचबन, लोणीकंद कुस्ती मैदान, खंडोबा माळ, फुलगाव शाळा, पेरणे गाव येथून पेरणे टोल नाका पर्यंत २५० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

**शिक्रापूर विभाग**

- दि. ३१/१२/२०२४ रोजी सकाळी ०७.०० पासून शिक्रापूर रोड, जीत पार्किंग वक्फ बोर्ड, पिंपळे जगताप चाकण रोड ते भिमा कोरेगांव विजयस्तंभ पर्यंत १४० बसेस आणि वढू पार्किंग इनामदार हॉस्पिटल ते वढू पर्यंत १० बसेस अशा एकूण १५० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.
- तसेच दि. ०१/०१/२०२५ रोजी पहाटे ०४.०० ते रात्री १२.०० पर्यंत शिक्रापूर रोड, जीत पार्किंग वक्फ बोर्ड, पिंपळे जगताप चाकण रोड येथून ३५० बसेस व वढू पार्किंग इनामदार हॉस्पिटल ते वढू पर्यंत ३० बसेस अशा एकूण ३८० मोफत (विनातिकिट) बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील विविध स्थानकांवरून प्रवास भाडे आकारणी करून कुस्ती मैदान लोणीकंद पर्यंत जादा बसेसचे नियोजन देखील करण्यात आले आहे.

**प्रवास भाडे आकारणी करून बसेसचे नियोजन खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | स्थानकाचे नांव | मार्गावरील बसेसची संख्या | जादा बसेसची संख्या | एकूण बसेसची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे स्टेशन मोलेदिना बस स्थानक | ०० | ३१ | ३१ |
| २ | मनपा भवन बस स्थानक | २६ | ३३ | ५९ |
| ३ | दापोडी मंत्री निकेतन | ०० | ०२ | ०२ |
| ४ | ढोले पाटील रोड मनपा शाळा | ०० | ०२ | ०२ |
| ५ | अप्पर डेपो बस स्थानक | ०० | ०४ | ०४ |
| ६ | पिंपरी आंबेडकर चौक | ०० | ०३ | ०३ |
| | **एकूण** | **२६** | **७५** | **१०१** |

वरील प्रमाणे पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील ६ बसस्थानकांवरून नियमित मार्गाच्या २६ व जादा ७५ अशा एकूण १०१ बसेसचे संचलन करण्यात येणार आहे.

तरी भाविक व नागरिकांनी सदर बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

**Sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. २८/१२/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

**Sd/-**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---